# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

*कालमर्यादा दिनांक : ५.७.२०१७*

क्रमांक : १०/एनजीपी /विद्यार्थी बदली/२०१७-१८/ ३५८e
दिनांक : २३|०६|२०१७

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था / पदविका अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे किंवा विभागांतर्गत विद्यार्थ्यांना संस्था स्थलांतर/ बदली करण्यास विभागीय कार्यालय स्तरावर मान्यता देणेबाबत...

संदर्भ :- १. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता पुर्णवेळ व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम प्रवेश माहिती पुस्तिकेतील विद्यार्थी बदलीबाबत नियम क्रमांक १६.
२. संचालनालयाचे पत्र क्रमांक : १०/एनजीपी/संस्था स्थलातंरण/२०१७/३५००, दिनांक : १६.६.२०१७.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन प्रवेश नियमावलीत पदविका अभ्यासक्रमांत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संस्था स्थलांतरण/ बदलीबाबत नमूद नियम क्रमांक १६ मध्ये नमूद नियमांच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भीय क्रमांक २ च्या पत्रान्वये विद्यार्थी संस्था स्थलातंरणाबाबत करावयाचे कार्यवाहीबाबत कळविण्यात आलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये संस्था बंद/ अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे विद्यार्थी स्थलातंरणचे प्रस्ताव या संचालनयालयास प्राप्त होत आहेत. सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विभागातंर्गत अन्य संस्थांमध्ये खालील नमूद प्रकरणी विद्यार्थ्यांचे संस्था स्थलांतर/ बदली करीता संबंधीत संस्था/ विद्यार्थ्यांमार्फत सादर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेस/ अभ्यासक्रम बंद करण्यास मान्यता देण्यात आलेली असल्यास व याबाबत संबंधीत संस्थेने विद्यार्थी स्थलांतरणाबाबत/ बदलीबाबत प्रस्ताव सादर केलेला असल्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता व्दितीय वर्ष व तृतीय वर्षाकरीता पात्र झालेले विद्यार्थी.
२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेमार्फत पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेस मुदतवाढ देण्यात आलेली नसल्यास/ नो-ॲडमिशन कॅटेगरीत असल्यास याबाबत संबंधीत संस्थेने विद्यार्थी स्थलांतरणाबाबत/ बदलीबाबत प्रस्ताव सादर केलेला असल्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता व्दितीय वर्ष व तृतीय वर्षाकरीता पात्र झालेले विद्यार्थी.
३. विभागातंर्गत एका संस्थेतून दुसऱ्या अन्य संस्थेत स्थलांतराने विद्यार्थी बदली बाबत संबंधीत प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमात उत्तीर्ण विद्यार्थ्यांमार्फत आलेले अर्ज.

तसेच अन्य संस्थांमध्ये विभागांतर्गत स्थलांतराने विद्यार्थी बदली खालील बाबी विचारात घेवून करण्यात यावी. तसेच व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या संस्था बदलाची कार्यवाही दिनांक : ५.७.२०१७ पर्यंत पुर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

१. विद्यार्थ्यांचे पंसतीक्रम विचारात घेवून नजीकच्या संस्थेत रिक्त जागेवर,
२. अभ्यासक्रम निहाय मंजूर प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत उपलब्ध रिक्त जांगावर (२०% supernumeric जागा वगळून ),
३. संस्था स्थलातंरणासाठीच्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास व रिक्त जागा उपलब्ध नसल्यास अभ्यासक्रम निहाय मंजूर प्रवेश क्षमतेच्या व्यतिरिक्त ४ ते ५ च्या मर्यादेपर्यंत.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

पृष्ठांकन/तशिस/विकाना/शैवि-2/पदविका/2017/1773
दिनांक:- 23 JUN 2017

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका संस्था,
नागपूर विभाग नागपूर,

उपरोक्त पत्रात नमुद केल्या प्रमाणे संबंधीत संस्थानी द्वितीय वर्षाच्या संस्था बदलाचे प्रस्ताव दिनांक 30/06/2017 या कार्यालयास सादर करण्यात यावे.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर